महाराष्ट्र शासन
मृद व जलसंधारण विभाग,
मंत्रालय (विस्तार इमारत), दालन क्र.७३२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०००३२.
दूरध्वनी क्र : ०२२-२२०२३५२४ Email ID : jal2.swcd-mh@gov.in

क्रमांक : आस्थाप-२०१८/प्र.क्र.१८/जल-२ दिनांक : २८ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

१) श्री.मधुकर अर्दड, अध्यक्ष तथा आयुक्त, मृद व जलसंधारण, वाल्मी, छ. संभाजी नगर
२) श्री.सु.पां.कुशिरे, सदस्य तथा अपर आयुक्त जलसंधारण,मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे. सध्या- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळ, छ.संभाजीनगर
३) श्री.वि.म.देवराज, सदस्य तथा अपर आयुक्त जलसंधारण, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, नागपूर
४) श्री.नि.म.दुसाने, सदस्य तथा प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नागपूर
५) श्री.ह.का.गिते, सदस्य तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, नाशिक
६) श्री.अब्दुल फरिद खान, सदस्य तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, ठाणे
७) श्रीमती भाग्यश्री राजेंद्र पाठक, सदस्या तथा सहायक प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, छ.संभाजीनगर
८) श्रीमती सविता खरपे-हारकर, सदस्या सचिव तथा उप आयुक्त (प्रशासन), आयुक्त यांचे कार्यालय, मृद व जलसंधारण, छ. संभाजी नगर

विषय : मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील जलसंधारण व जिल्हा परिषद यंत्रणेमधील जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-"ब" (अराजपत्रित) या संवर्गातील ६७० रिक्त पदे भरण्याबाबत.

संदर्भ : शासन समक्रमांकाचे दि.०२.११.२०२३ रोजीचे पत्र

महोदय,

मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-"ब" (अराजपत्रित) या संवर्गातील ६७० रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने आढावा घेण्याकरीता मा. सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांचेकडे दिनांक ०८.११.२०२३ रोजी दुपारी ३.०० वा. त्यांचे मंत्रालयीन दालनात बैठक संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडण्यात आले आहे.

आपला,

(श.ह. खांरोडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत : १) सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
२) उप सचिव (जल-२), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
३) निवडनस्ती (जल-२)

F:\कनिष्ठ अभियंता भरती.docx

ooacademypune


कृषिसेवक ऑनलाइन बॅच
फी कमी यशाची हमी ..
LIVE + Recorded class
"-वैशिष्ट्ये-"
मोफत नोट्स ,टेस्ट ,ई-बुक
Digital Board वर लाईव्ह क्लास
सर्व विषयांचे रेकॉर्डेड लेक्चर
मोफत टेस्ट सिरीज
जुन्या प्रश्नपत्रिका विश्लेषण
लेक्चर मिस झाल्यावर अनलिमिटेड वेळा पाहू शकता.
संपर्क
8010457760
9923570901

विषय :- मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-"ब" (अराजपत्रित) या संवर्गातील ६७० रिक्त पदे भरण्यासंदर्भात दि.०८.११.२०२३ रोजी दुपारी ३.०० वा. झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

मृद व जलसंधारण विभागातील क्षेत्रिय आस्थापनेवरील नामनिर्देशनाच्या कोट्यातील जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-"ब" (अराजपत्रित) या संवर्गाची पदे सरळसेवेने भरण्यासाठी दि.१९.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय निवड समिती गठीत करण्यात आली आहे.

२. सदर समितीमार्फत, मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-"ब" (अराजपत्रित) या संवर्गातील पदभरतीच्या अनुषंगाने अद्याप जाहिरात प्रसिध्द न झाल्यामुळे यासंदर्भात आढावा घेण्याकरीता मा.सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८.११.२०२३ रोजी दुपारी ३.०० वा. त्यांचे मंत्रालयीन दालनात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस विभागाचे श्री.यु.ब.अजेटराव, उपसचिव व श्री.श.ह.खारोडे, कक्ष अधिकारी (जल-२) उपस्थित होते. तसेच समितीतील सदस्य व टि.सी.एस.आयओएन कंपनीतील प्रतिनिधी खालीलप्रमाणे उपस्थित होते.

ooacademypune

| अ.क्र. | नाव व पदनाम |
|---|---|
| १ | श्री.सु.पां.कुशिरे, सदस्य तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळ, छ.संभाजीनगर (व्ही.सी.द्वारे) |
| २ | श्री.वि.म.देवराज, सदस्य तथा अप्पर आयुक्त जलसंधारण, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, नागपूर (व्ही.सी.द्वारे) |
| ३ | श्री.नि.म.दुसाने, सदस्य तथा प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नागपूर (व्ही.सी.द्वारे) |
| ४ | श्री.ह.का.गिते, सदस्य तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, नाशिक |
| ५ | श्री.अब्दुल फरिद खान, सदस्य तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, ठाणे |
| ६ | श्रीमती सविता खरपे-हारकर, सदस्या तथा उप आयुक्त (प्रशासन), आयुक्त यांचे कार्यालय, मृद व जलसंधारण, छ. संभाजीनगर |
| ७ | श्रीमती भाग्यश्री राजेंद्र पाठक, सदस्या तथा सहायक प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, छ.संभाजीनगर |
| ८ | श्री.शैलेश परब, Delivery Manager, TCS |
| ९ | श्री.मयुर घुगे, Program Manager, TCS |
| १० | श्री.विशाल पटेल, Project Manager, TCS |


जिल्हापरिषद (ZP)+तांत्रिक विषयासहित
ONLINE BATCH START 2023
• आरोग्यसेवक भरती
• आरोग्यसेवक भरती
• ग्रामसेवक भरती
• कृषिसेवक भरती
• अंगणवाडी भरती
HURRY!
LIMITED SEATS ONLY
Officers Online Academy
OOA
eLearning Education Platform
सर्व कोर्स Laptop आणि i-phone
वरती पाहण्याची सुविधा उपलब्ध
ooacademypune
Co : 8010457760/8329588625
जुन्या प्रश्नपत्रिका विश्लेषण.
सर्व विषयांचे रेकॉर्डेड लेक्चर.
VIDEO DOWNLOAD सुविधा.
टेस्ट सिरीज, ई-बुक, नोटस मोफत.

३. मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-"ब" (अराजपत्रित) या संवर्गातील पदभरतीच्या अनुषंगाने बैठकीमध्ये, समितीच्या सदस्य सचिव श्रीमती सविता खरपे-हारकर यांनी सांगितले की, माहे एप्रिल, २०२३ मध्ये टिसीएस कंपनीला पदभरतीकरीता कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे, त्यानंतर कंपनीसोबत करारनामा करण्यात आलेला असून, शासनमान्यतेने अभ्यासक्रम निश्चित केलेला आहे व परिक्षेची काठिण्यपातळी मध्यम ठेवण्यात आलेली आहे.

१) यासंदर्भात, टि.सी.एस.आयओएन कंपनीतील प्रतिनिधींनी सांगितले की, जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-"ब" (अराजपत्रित) या संवर्गातील पदभरतीकरीता उमेदवारांकडून शुल्क भरणा करुन घेण्यासाठी पेमेंट गेटवेबाबतची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही, सदर माहिती प्राप्त झाल्यास अर्जाचा नमुना पूर्ण करता येईल. त्यावर मा. सचिव, मृद व जलसंधारण यांनी समितीच्या सदस्य सचिव यांना निर्देश दिले की, दोन दिवसाचे आत पेमेंट गेटवेबाबत कार्यवाही पूर्ण करुन कंपनीस अवगत करावे.

२) जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-"ब" (अराजपत्रित) या संवर्गातील पदभरतीकरीता घेण्यात येणाऱ्या परीक्षेकरीता परीक्षेच्या ठिकाणी जॅमरच्या व्यवस्थेकरीता टि.सी.एस.आयओएन कंपनीला अधिकार नसल्याचे टि.सी.एस.आयओएन कंपनीतील प्रतिनिधींनी सांगितले. त्यावर BEL किंवा ECIL या कंपनीकडून जॅमर उपलब्ध करुन घेता येतील, यासंदर्भात समितीकडून कार्यवाही करण्याचे निर्देश मा. सचिव, मृद व जलसंधारण यांनी दिले.

३) सदर परीक्षेकरीता परीक्षेच्या केंद्र स्थळावर निरीक्षक नेमण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी यांची राहील, असे ठरविण्यात आले.

४) जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-"ब" (अराजपत्रित) या संवर्गातील पदभरतीची जाहिरात माहे, नोव्हेंबर २०२३ अखेर प्रसिध्द होईल यासाठी कालबध्द कार्यक्रम आयुक्त, मृद व जलसंधारण यांनी निश्चित करुन तातडीने कार्यवाही करणेबाबत मा. सचिव, मृद व जलसंधारण यांनी निर्देश दिले.

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

*******

ooacademypune